# वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी

## विद्यापीठाने निर्मिती केलेले सुधारीत व संकरीत वाणाबद्दल सर्व समावेशक व सविस्तर माहिती

| अ.क्र. | तपशील | | सविस्तर माहिती |
|---|---|---|---|
| १ | पीक/वाणाचे नाव | | **रब्बी ज्वारी : सी.एस.व्ही. १८ (परभणी ज्योती)** |
| २ | प्रसारीत केल्याचे वर्ष | | २००५ |
| ३ | प्रसारीत करणारी संस्था/विद्यापीठ | | वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी |
| ४ | जमीन | | मध्यम ते भारी जमीन व पाण्याचा निचरा होणारी |
| ५ | हवामान | | समशीतोष्ण व कोरडे |
| ६ | पेरणी/लागवडीचा कालावधी | | १ ऑक्टोबर ते १५ ऑक्टोबरपर्यंत |
| ७ | प्रती एकर बियाणे | | ४ किलो / एकर |
| ८ | पीक व्यवस्थापन | | |
| | १ | लागवडीचे/पेरणीचे व्यवस्थापन | **पेरणीचा कालावधी :** मराठवाडा विभागामध्ये खोडमाशीचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी ऑक्टोबर महिन्यात पहिला पंधरवाडा (१ ते १५ ऑक्टोबर) हा कालावधी सर्वात चांगला असून या काळात पेरणी केल्यास उत्पादनात वाढ होते. <br> **बीजप्रक्रिया:** काणी रोगाच्या प्रतीबंधासाठी पेरणीपुर्वी बियाण्यास ३०० मेश पोताच्या गंधकाची ४ ग्रॅम किंवा थायरस ३ ग्रॅम प्रती किलो बियाणे या प्रमाणात प्रक्रिया करावी. <br> **बियाणाचे प्रमाण :** सुधारीत वाणांचे हेक्टरी १० किलो बियाणे वापरावे. <br> **ओलावा साठवणुक :** पेरणीपुर्वी १५ दिवस अगोदर बळीराम नांगराने दोन ओळीतील अंतर ४५ सेमी ठेवुन स-या काढाव्यात आणि स-यामध्ये परतीचा पाऊस झाल्याबरोबर तिफणीच्या सहाय्याने पेरणी करावी. सोयाबीन पिकाच्या लवकर येणा-या वाणानंतर ज्वारीचे पीक घ्यावयाचे असल्यास कमीत कमी (शुन्य) मशागत करुन ज्वारीची पेरणी करणे फायदेशीर ठरते. <br> **आंतरमशागत :** पीक ४० ते ५० दिवसाचे होईपर्यंत किमान ३ कोळपण्या कराव्यात त्यामुळे तणांचा प्रादुर्भाव कमी होऊन जमीन भुसभुशीत राहते आणि ओलावा साठवण्यास मदत होते. |
| | २ | खत व्यवस्थापन | **रासायनिक खतांचा वापर :** पेरणीपुर्वी ८ दिवस किंवा पेरणी करतांना कोरडवाहुसाठी हेक्टरी ४० किलो नत्र अधिक २० किलो स्फुरद हि मात्रा तर ओलितासाठी ८० किलो नत्र + ४० किलो स्फुरद + ४० किलो पालाश हि मात्रा १२ सें.मि. खोल पेरुन दिल्यास उत्पादनात ३० ते ३५ टक्के वाढ होते. |
| | ३ | पाणी व्यवस्थापन | **पाणी व्यवस्थापन:** रब्बी ज्वारीला ३०-४० सेंमी पाण्याची गरज असते. ओलीताखालील ज्वारीला सिंचनाच्या उपलब्धतेनुसार पिकांच्या संवेदनशील अवस्थेमध्ये पाण्याच्या पाळया सारा पध्दतीने द्याव्यात. |

<table>
<tr><td></td><td></td><td></td><td>उपलब्ध पाण्याच्या पाळयानुसार खालील प्रमाणे नियोजन करावे.
<table>
<tr><th>पाण्याच्या उपलब्ध पाळया</th><th>संवेदनशील अवस्था</th><th>पेरणीपासुन लागणारा कालावधी (दिवस)</th></tr>
<tr><td>१</td><td>पीक पोटरीत येण्यापुर्वी</td><td>३०-४५</td></tr>
<tr><td>२</td><td>पोटरी अवस्था<br>फुलोरा</td><td>४०-४५<br>६०-६५</td></tr>
<tr><td>३</td><td>रोपावस्था<br>पोटरी<br>फुलोरा</td><td>२५-३०<br>४०-४५<br>६०-६५</td></tr>
<tr><td>४</td><td>रोपावस्था<br>पोटरी<br>फुलोरा<br>दाणे भरण्याचा काळ</td><td>२५-३०<br>४०-४५<br>६०-६५<br>४५-९०</td></tr>
</table></td></tr>
<tr><td></td><td>४</td><td>कीड व्यवस्थापन</td><td>खोडमाशी<br>निंबोळी अर्क ५ टक्केची फवारणी करावी. किंवा<br>क्विनॉलफॉस २५ टक्के प्रवाही, २० मिली / १० लीटर पाणी किंवा<br>ऑक्सीडेमेटॉन मीथाइल २५ टक्के प्रवाही,२० मिली / १० लीटर पाणी<br>मावा (चिकटा) : खालीलपैकी एका कीटकनाशकाची दिलेल्या माञेप्रमाणे १० लीटर पाण्यात मिसळुन फवारणी करावी.<br>डायमेथोएट ३० टक्के प्रवाही, १० मि. ली.<br>इमीडॅक्लोप्रीड १७.८ टक्के प्रवाही, ३ मि. ली.</td></tr>
<tr><td></td><td>५</td><td>रोग व्यवस्थापन</td><td>काणी /काजळी : हा रोग प्रामुख्याने रब्बी हंगामात येतो.<br>रोग व्यवस्थापन : या रोगाचा बंदोबस्त करण्यासाठी शेतातील रोगट झाडे दिसताच काळजीपुर्वक काढुन घ्यावीत व प्लॉस्टीक पिशवीत गोळा करावी. काळी पावडर जमिनीवर पडणार नाही याची काळजी घ्यावी. ही जमा केलेली रोगट कणसे शेताबाहेर जाळुन नष्ट करावी. पिकांची फेरपालट करावी. बियाण्याची कार्बेन्डिझम + थायरम (व्हिटाव्हॅक्स) २.५ ग्रॅम/प्रती किलो किंवा गंधकाची ४ ग्रॅम प्रती किलो बियाण्यासोबत बीजप्रक्रिया करावी.<br>खडखडया रोगः<br>१. पिकाची फेर पालट करावी म्हणजेच दरवर्षी त्याच जमिनीवर रब्बीचे पीक घेऊ नये.<br>२. हलक्या जमिनीवर कोरडवाहु पध्दतीने पेरणी करतांना खडखडया रोगास प्रतीकारक्षम जातीचा वापर करावा.<br>३. पीक फुलोरा अवस्थेत असतांना शक्य असल्यास पाण्याची एक पाळी द्यावी.<br>४. खताची योग्य मात्रा देऊन सुध्दा या रोगाचा प्रादुर्भाव ब-याच प्रमाणात कमी करता येतो.<br>५. रब्बी ज्वारीची पेरणी करताना जैविक बुरशीनाशकाची १० ग्रॅम /</td></tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| | | किलो बियाण्यास बीज प्रक्रिया करावी. |
| ९ | **पिकाचा कालावधी** | १२५-१३० दिवस |
| १० | **उत्पादकता** | धान्य ३८-४० क्विंटल / हेक्टर<br>कडबा ८५-९० क्विंटल / हेक्टर |
| ११ | **वाणाची वैशिष्ट्ये/विशेष गुणधर्म** | १. हा वाण ओलितासाठी प्रसारीत करण्यात आला आहे.<br>२. हा वाण उंच वाढणारा असल्यामुळे कडब्याचे अधिक उत्पन्न<br>३. मावा या किडीस प्रतीकारक्षम<br>४. हा वाण उंच असला तरी जमिनीवर लोळत नाही. |
| १२ | **वाणासंबंधीचे छायाचित्रे** |  |